# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि.
## कोकण परिमंडळ कार्यालय
## ग्राहक तक्रार निवारण मंच रत्नागिरी

---

**ग्राहक तक्रार क्र. ०३/२०१७ दाखल दि. १०.०३.२०१७**

| | |
|---|---|
| **श्री. यशवंत जगन्नाथ कावतकर**<br>**रा. साईनगर,कोदवली**<br>**ता. राजापूर**<br>**जि. रत्नागिरी** | **तक्रारदार ग्राहक** |

**विरुध्द**

| | |
|---|---|
| **कार्यकारी अभियंता, महावितरण**<br>**विभागीय कार्यालय रत्नागिरी** | **विरुध्द पक्षकार** |
| **फोरम उपस्थिती** | **१) वि.श. गुळवणी**<br>**अध्यक्ष**<br>**२) श्री. एस. एस. तायडे,**<br>**प्रभारी सचिव तथा कार्यकारी अभियंता** |
| **ग्राहकाच्या वतीने** | **१) यशवंत जगन्नाथ कावतकर**<br>**(ग्राहक स्वतः)** |
| **विरुध्द पक्षकाराच्या वतीने** | **१) श्री. इ.व्ही. मामिलवाड**<br>**कार्यकारी अभियंता,**<br>**विभागीय कार्यालय,रत्नागिरी** |

**महाराष्ट्र वीज नियामक आयोग, [ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल (ओम्बुडस्मन)] विनियम २००६ मधील ६.५ चे तरतुदीनुसार :**

## न्यायनिर्णय

मी वि.श.गुळवणी अध्यक्ष, ग्राहक तक्रार निवारण मंच, कोकण परिमंडल,रत्नागिरी खालीलप्रमाणे न्यायनिर्णय देत आहे.

१) तक्रारदार यांनी, त्यांना शेतीपंपासाठी नवीन वीजजोडणी त्वरीत मिळणेसाठी आणि नुकसानभरपाईपोटी एक लाख रुपये मिळणेसाठी सदरअपील या मंचासमोर दि.१०.०३.२०१७ रोजी दाखल केले आहे.

------------------गाऱ्हाण्याचे संक्षिप्त स्वरुप-----------

२) उपरोक्त तक्रारदार यांची मौजे कोदवली ता. राजापूर येथे सर्व्हे क्र. ९९/२/२ ची शेत जमीन असून त्यामध्ये त्यांनी विहीर खोदली आहे. हापूस आंब्यांची १४८ कलमे व इतर झाडे त्यांनी सदर शेतीत लावली आहे. झाडांना पाणी घालणेसाठी दरमहा १०,०००/- रु. पगारावर त्यांनी मजूर नेमले आहेत. तक्रारदार यांनी दि.१०.०४.२०१६ रोजी शेतीपंपासाठी वीजजोडणी मिळणेचा रितसर अर्ज विरुद्ध पक्षकार यांच्या संबंधीत कार्यालयात दाखल केला,परंतु कोटेशन प्राप्त झाले नव्हते. त्यांना लवकर वीजजोडणी न मिळाल्यामुळे त्यांनी दि.२१.१०.२०१६ रोजी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, रत्नागिरी यांचेकडे तक्रार अर्ज दाखल केला. सदर कक्षाने दि.२०.०२.२०१७ रोजी निर्णय देऊन संबंधीत ठेकेदाराकडून, नियमानुसार,शेतीपंपासाठी त्वरीत वीजजोडणी करणेत यावी असा आदेश केला. तो मान्य झाला नसल्याने प्रस्तुत अपील तक्रारदार यांनी दाखल केले आहे.

---------------- वितरण कंपनीची भूमिका-----------

३) विरुद्ध पक्षकार तर्फे अंतर्गत तक्रार निवारण कक्षात जी भूमिका घेतली तीच येथेही घेतली आहे. तक्रारदार यांनी वीजजोडणीसाठी भरणा करावयाची रक्कम डिसेंबर २०१६ मध्ये जमा केला आहे. तक्रारदार यांनी A-१ फॉर्म सादर केलेनंतर सर्व्हे करणेत आला आणि अंदाजपत्रक मंजूरीसाठी दि.१०.०८.२०१६ रोजी उपविभागीय कार्यालयास पाठवले होते. त्यास मिळालेल्या मंजूरीप्रमाणे तक्रारदार यांनी रक्कम रु. १२२०/- दि. २२.११.२०१६ रोजी भरले आहेत. त्यांचे नाव प्रतिक्षा यादीत आहे. शेतीपंप कनेक्शनसाठी मंडल कार्यालय,रत्नागिरी यांनी निवीदा काढली असून कंत्राटदाराचे नेमणूकीनंतर तक्रारदार यांना प्रतिक्षा यादीप्रमाणे वीजजोडणी देणेत येईल.

४) सदर प्रकरणाची सुनावणी आज दि. २८.०४.२०१७ रोजी या मंचाकडे घेणेत आली. त्यावेळी तक्रारदार स्वतः हजर होते. विरुद्ध पक्षकरातर्फे कार्यकारी अभियंता श्री. मामिलवाड हजर होते. त्यांची तोंडी निवेदने ऐकणेत आले. सर्व उपलब्ध कागदपत्रे वाचणेत आली आहेत. तक्रारदार यांनी आज लेखी युक्तिवादही दाखल केला आहे.

५) या मंचाच्या निर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित होतात.

१) तक्रारदार यांना निश्चित कालावधीत शेतीपंपासाठी नवीन वीजाजोडणी देण्याचा विरुध्द पक्षकार यांना आदेश करणे योग्य होईल का?

उत्तर- होय.

२) तक्रारदार हे त्यांनी मागितल्याप्रमाणे नुकसानभरपाई मिळण्यास पात्र आहेत काय ?
उत्तर- नाही.

३) कोणता अंतिम आदेश?
उत्तर- शेवटी नमूद केल्याप्रमाणे.

**---------------कारणमिमांसा--------------**

६) तक्रारदार यांचे मालकी वहिवाटीची मौजे कोदवली ता. राजापूर येथे शेतजमीन आहे. त्यांचे म्हणणे असे की त्यांनी सदर जमिनीत १४८ हापूस आंब्याची कलमे व इतर झाडे लावली असून त्यांच्या देखभालीसाठी व पाणी घालण्यासाठी श्री. निलेश कुंभार व सौ. निशा कुंभार यांना मासिक दहा हजार रुपाये पगारावर मजूर नेमले आहे. तक्रारदार यांनी शेतीपंपासाठी वीजजोडणी मिळणेबद्दल रितसर अर्ज केला, परंतु त्यांना कोटेशन सुध्दा लौकर देणेत आले नाही. अखेर कोटेशनप्रमाणे त्यांनी जरुर ती रक्कम दि.२२.११.२०१६ रोजी भरणा केली. तथापि त्यांना त्वरीत वीजजोडणी मिळाली नाही, त्यामुळे त्यांना अंतर्गत तक्रार निवारण कक्षाकडे तक्रार दाखल करावी लागली. असे दिसून येते की तक्रारदार यांना वीजजोडणी देण्यासाठी ०.५ कि.मी. लघुदाब वाहिनी उभारणे गरजेचे आहे. तथापि, कृती मानके विनियमातील तरतूदीप्रमाणे तक्रारदार यांना तीन महिन्यात वीजजोडणी मिळाली नाही. विरुद्ध पक्षकार यांचे असे म्हणणे आहे की तक्रारदार यांना प्रतिक्षा यादीप्रमाणे वीजजोडणी देणेत येईल.

७) कृती मानके विनियमाप्रमाणे तक्रारदार यांना तीन महिन्यात नवीन वीज जोडणी मिळणे आवश्यक होते. सदर तरतूदीनुसार जर मुदतीत वीज पुरवठा देणेत आला नाही तर पुढे होणाऱ्या विलंबासाठी प्रति आठवडा १००. रु. भरपाई देणेत यावी असे नमूद केले आहे. इतकेच नाही तर विद्युत कायदा २००३ च्या कलम ४३(३) यामध्ये वितरण परवाना धारकास दंड ठोठावण्याची तरतूद केंद्र शासनाने केली आहे. नवीन वीज जोडण्या देणे बाबतीत जर वितरण कंपनीस अडचणी येत असतील तर त्यांचे निवारण मा. विद्युत नियामक आयोगाकडून करुन घेणे अनिवार्य आहे. प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य किंवा जेष्ठता यादीनुसार वीज जोडणी देणे या तत्वांचा वापर या ठिकाणी करता येत नाही. सदर तत्वे, वर नमूद केलेल्या कायद्यातील कठोर तरतूदीपुढे गौण ठरतात.

८) तक्रारदार यांनी झालेल्या नुकसानीपोटी व मनस्तापापोटी एक लाख रुपये नुकसानभरपाई विरुद्ध पक्षकार कडून मिळणेची विनंती केली आहे. तथापि, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ मधील कलम ८.२ च्या तरतुदीनुसार ग्राहकास अप्रत्यक्ष,परिणामरुप, दंडात्मक वगैरे प्रकारची भरपाई मिळणेचा हक्क रहात नाही. याकामी अन्य कोणत्याही प्रकारची भरपाई तक्रारदारातर्फे मागणेत आलेली नाही.

९) वरील सर्व कारणांस्तव तक्रारदार यांना निश्चित कालावधीत वीजजोडणी देणेबाबतचा आदेश करणे योग्य होईल असे या मंचाचे मत आहे.

सबब खालीलप्रमाणे अंतिम आदेश करणेत येत आहे.

## आदेश

१) **तक्रारदार श्री. यशवंत जगन्नाथ कावतकर, रा. कोदवली, ता. राजापूर, जि. रत्नागिरी यांना त्यांच्या मागणी प्रमाणे शेतीपंपासाठी नवीन वीजजोडणी दि. ३१.०५.२०१७ पर्यंत विरुद्ध पक्षकार यांनी द्यावी असा विरुद्ध पक्षकार यांना आदेश करणेत येतो.अन्यथा दि.०१.०६.२०१७ पासून विलंबापोटी प्रत्येक आठवडयास विरुद्ध पक्षकार यांनी तक्रारदार यांना शंभर रुपये भरपाई देण्यात यावी.**

२) **तक्रारदार यांची नुकसानभरपाई मिळणेची मागणी अमान्य करण्यात येत आहे.**

३) **या आदेशाविरुध्द अर्जदारास अपील करावयाचे असल्यास खालील पत्त्यावर हा आदेश मिळाल्यापासून ६० दिवसात अपील दाखल करता येईल.**

**पत्ता :- सचिव,**
**विद्युत लोकपाल**
**महाराष्ट्र विदयुत नियामक आयोग,**
**६०६/६०८, केशवा,**
**बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, मुबंई ४०००५**
**फोन नं. ०२२- २६५९२९६५**

**वि. श. गुळवणी**
**अध्यक्ष,**
**ग्रातनिमं,कोकण परिमंडल**

**श्री .एस.एस.तायडे**
**प्रभारी सचिव / कार्यकारी अभियंता**
**ग्रातनिमं, कोकण परिमंडल**

**दिनांक :- २८.०४.२०१७**
**ठिकाण :- रत्नागिरी.**